# पनवेल महानगरपालिका, पनवेल

## ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१०२०६

दूरध्वनी कार्यालय : ०२२–२७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. : ०२२-२७४५२२३३
उपायुक्त कार्यालय : ०२२-२७४५५७५१ आयुक्त कार्यालय : ०२२ - २७४५२३३९
ई-मेल : Email :panvelcorporation@gmail.com वेबसाईट : www.panvelcorporation.com

जा.क्र./पमपा/आस्था/१६८/२०२० दिनांक : २५/०२/२०२०

## थेट मुलाखत (Walk in Interview)

## (फक्त शासकीय / निमशासकीय कर्मचारी /नगरपालिका / महानगरपालिकामधून सेवानिवृत्त कनिष्ठ लिपिक व वरिष्ठ लिपिक)

पनवेल महानगरपालिकेमध्ये सामान्य प्रशासन विभागात जनगणना इ. विवक्षित कामकाजाकरिता खालील नमूद केल्याप्रमाणे शासकीय/निमशासकीय कार्यालय तसेच नगर परिषद/ महानगरपालिकेच्या सेवेतील सेवानिवृत्त कनिष्ठ/वरिष्ठ लिपिक यांची महापालिका अधिनियम १९४९ कलम ५३ मधील तरतुदीनुसार तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी तत्त्वावर व ठोक वेतनावर खालील अटी व शर्तीनुसार सेवा प्राप्त करून घेण्यासाठी दिनांक ०३/०३/२०२० रोजी थेट मुलाखत (Walk in Interview) आयोजित केली आहे. इच्छुक उमेदवारांनी दिनांक ०३/०३/२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता वासुदेव बळवंत फडके, नाट्यगृह, पनवेल येथे आपली मूळ कागदपत्रे, सेवा निवृत्तीचे प्रमाणपत्र, अंतिम वेतन प्रमाणपत्र, ना विभागीय चौकशी प्रमाणपत्र व अनुषंगिक कागदपत्रे घेऊन स्वतः हजर राहावे. सविस्तर जाहिरात महापालिकेच्या www.panvelcorporation.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

| अ. क्र. | सेवानिवृत्त कर्मचारी वर्ग-३ | कर्मचाऱ्यांची संख्या | विवक्षित कामे | अनुभव | शैक्षणिक अर्हता व वय | ठोक मानधन |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | शासकीय/ निमशासकीय कार्यालय तसेच नगर परिषद/ महानगरपालिकेच्या सेवेतील सेवानिवृत्त कनिष्ठ/ वरिष्ठ लिपिक | २० | १. जनगणना<br>२. अनधिकृत बांधकाम/अतिक्रमण<br>३. पाणीपट्टी<br>४. मालमत्ता<br>५. जाहिरात परवाना<br>६. लेखा विभाग | शासकीय / निमशासकीय कार्यालय तसेच नगर परिषद/ महानगरपालिकेच्या सेवेतील सेवानिवृत्त कनिष्ठ/वरिष्ठ लिपिक म्हणून किमान ५ वर्षाचा अनुभव | १) शासनाने विहित केलेली शैक्षणिक अर्हता १२वी/पदवी आणि मराठी / इंग्रजी टंकलेखन अनुक्रमे ३० व ४० प्र.श.मि. शासन प्रमाणपत्र<br>२) दि. ३१/०७/२०१८ अखेर वय वर्षे ६३ पेक्षा जास्त नसावे. | रु. २०,०००/- |

**अटी व शर्ती :-**

१) करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितांस शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे/सामावून घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/हक्क नसेल.

२) नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा कर्मचाऱ्यांच्या करार पद्धतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

३) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेला नसावा.

४) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने गुंतलेले हितसंबंध (conflict of interest) जाहीर करणे आवश्यक राहील.

५) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे/माहिती व आधार सामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.

६) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत सक्षम असलेले प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मूल्यमापन करतील.

७) सेवानिवृत्त कनिष्ठ लिपिक/वरिष्ठ लिपिक कर्मचाऱ्यांची सेवा ही फक्त विवक्षित कामाकरिता राहणार आहे. तथापि नेमण्यात आलेल्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या व अधिकाऱ्यांच्या करार पद्धतीमधील कामकाजाचे मूल्यमापन करण्यात येईल. कामकाज उत्कृष्ट असल्यावरच त्यांना पुढे मुदतवाढ देण्याबाबत विचार करण्यात येईल.

**मा. आयुक्त यांचे मान्यतेने,**

सही/-
(जमीर लेंगरेकर)
उप आयुक्त-। (मुख्यालय)
पनवेल महानगरपालिका

# पनवेल महानगरपालिका

ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६

दूरध्वनी कार्यालय : ०२२-२७४५८०४०/४१/४२ — फॅक्स नं. : ०२२-२७४५२२३३

उपायुक्त कार्यालय : ०२२-२७४५५७५१ — आयुक्त कार्यालय : ०२२ - २७४५२३३९

ई-मेल :Email :panvelcorporation@gmail.com — वेबसाईट : www.panvelcorporation.com


जा.क्र./पमपा/आस्था/१६९/२०२० — दिनांक : २५/०२/२०२०

## थेट मुलाखत (Walk in Interview)

**(फक्त सेवानिवृत्त शासकीय / निमशासकीय कर्मचारी)**

पनवेल महानगरपालिके अंतर्गत पाणी पुरवठा विभाग, सामान्य प्रशासन विभागामध्ये विवक्षित कामकाजाकरिता खालील नमूद सेवानिवृत्त अभियंते / अधिकारी / लेखाधिकारी महाराष्ट्र शासन निर्णय दि. १७/१२/२०१६ मधील तरतुदीनुसार तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी तत्वावर व ठोक वेतनावर खालील अटी व शर्तीनुसार सेवा प्राप्त करुन घेण्यासाठी दिनांक ०३/०३/२०२० रोजी थेट मुलाखत (Walk in Interview) आयोजित केली आहे. इच्छुक उमेदवारांनी दिनांक ०३/०३/२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता वासुदेव बळवंत फडके, नाट्यगृह, पनवेल येथे आपली मूळ कागदपत्रे, सेवा निवृत्तीचे प्रमाणपत्र, अंतिम वेतन प्रमाणपत्र, ना विभागीय चौकशी प्रमाणपत्र व अनुषंगिक कागदपत्रे घेऊन स्वतः हजर राहावे. सविस्तर जाहिरात महापालिकेच्या www.panvelcorporation.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

| अ. क्र. | सेवानिवृत्त कर्मचारी वर्ग-३ | अधिकाऱ्यांची संख्या | विवक्षित कामे | अनुभव | शैक्षणिक अर्हता व वय | ठोक मानधन |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | शासकीय/ निमशासकीय सेवेतून सेवानिवृत्त उप अभियंता/ कार्यकारी अभियंता | ११ | १. पाणीपुरवठा विभाग नळ पाणीपुरवठा योजना, पाणीपुरवठा केंद्र देखभाल दुरुस्ती इ.चे कामकाज<br>२. अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम<br>३. बांधकाम विभाग<br>४. घनकचरा विभाग | शासकीय/निमशासकीय /महानगरपालिकेतील उपअभियंता/ कार्यकारी अभियंता पदी कामाचा किमान ५ वर्षाचा अनुभव | शासकीय/मान्यता प्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकी पदवी उत्तीर्ण BE (CIVIL) | शासन निर्णय दि. १७/१२/२०१६ नुसार |
| २ | शासकीय/ निमशासकीय सेवेतून सेवानिवृत्त अधिकारी | २८ | १ .सामान्य प्रशासन विभाग जनगणना इ.चे कामकाज<br>२. लेखा/लेखापरिक्षण विभाग<br>३. पाणीपुरवठा विभाग<br>४. बांधकाम विभाग<br>५. पायाभूत सोयी सुविधा<br>६. स्थानिक संस्था कर<br>७. आरोग्य विभाग<br>८. मालमत्ता विभाग<br>९. शिक्षण विभाग<br>१०. वाहन विभाग<br>११. आस्थापना विभाग<br>१२. अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम विभाग<br>१३. महिला बालकल्याण विभाग | शासकीय/निमशासकीय /महानगरपालिकेमधील वर्ग- १ दर्जाचा अधिकारी पदी कामाचा किमान ५ वर्षाचा अनुभव | शासकीय/मान्यता प्राप्त विद्यापीठाची कला, वाणिज्य, विज्ञान शाखेची पदवी परीक्षा उत्तीर्ण | शासन निर्णय दि. १७/१२/२०१६ नुसार |

**अटी व शर्ती :-**

१) करार पध्दतीने नियुक्ती करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी / अभियंता यांचे नियुक्तीच्या वेळी वय ६५ वर्षापेक्षा जास्त नसावे.

२) करार पध्दतीने नियुक्ती करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी/ अभियंता यांचे विरुध्द ते ज्या विभागातून सेवानिवृत्त झालेले आहेत त्या विभागात त्यांचेविरुध्द विभागीय चौकशी झालेली असल्यास किंवा चालू असल्यास त्यांना नियुक्तीस अपात्र ठरविण्यात येईल. सबब त्यांनी ना विभागीय चौकशी प्रमाणपत्र नियुक्तीच्या वेळेस सादर करणे आवश्यक राहिल. तसेच विहित शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र नियुक्तीच्या वेळी सादर करणे बंधनकारक राहिल.

३) करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितांस शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे / सामावून घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार / हक्क नसेल.

४) नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा सेवानिवृत्त अधिकारी / अभियंता यांच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

५) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेले सेवानिवृत्त अधिकारी / अभियंता यांना सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेला नसावा.

६) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या सेवानिवृत्त अधिकारी / अभियंता यांनी गुंतलेले हितसंबंध (conflict of interest) जाहीर करणे आवयक राहिल.

७) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या सेवानिवृत्त अधिकारी / अभियंता यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे / माहिती व आधार सामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहिल.

८) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या सेवानिवृत्त अधिकारी / अभियंता यांना सोपविलेले कामकाज निश्चत केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहिल. त्यांच्या कामकाजाबाबत सक्षम असलेले प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मूल्यमापन करतील.

९) सेवानिवृत्त अधिकारी / अभियंता यांची सेवा ही फक्त १ वर्षाच्या मर्यादेकरिताच राहणार आहे. तथापी नेमण्यात आलेल्या सेवानिवृत्त अधिकारी / अभियंता यांच्या करार पध्दतीमधील कामकाजाचे मूल्यमापन करण्यात येईल. कामकाज उत्कृष्ट असल्यावरच त्यांना पुढे मुदतवाढ देण्याबाबत विचार करण्यात येईल.

**मा. आयुक्त यांचे मान्यतेने,**

**सही/-**
**(जमीर लेंगरेकर)**
**उप आयुक्त-। (मुख्यालय)**
**पनवेल महानगरपालिका**